**पत्र**

क्र.कार्या-४-जिवस-आरआर/५९८/२०२२
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर
दिनांक : २९-११-२०२२

**प्रति,**
**मा. उपवनसंरक्षक,**
**कोल्हापूर वन विभाग, कोल्हापूर** ४१६ ००३

**विषय :-** **अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६, नियम २००८ व सुधारीत नियम २०१२ प्रलंबित वैयक्तिक वनहक्क दावेदारांची अतिक्रमण निष्कासित न करण्याबाबत.**

**संदर्भ :-** **शासन परिपत्रक महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई क्रमांक एस-१०/२०२२/प्र.क्र.२४३/फ-३, दि. २९-०८-२०२२**

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भिय शासन परिपत्रकाची झेरॉक्स प्रत सोबत जोडली आहे. सदर शासन परिपत्रकामध्ये दिले निर्देशास अनुसरून आपले स्तरावरून कार्यवाही करण्यात यावी.

02.12.22

**निवासी उप जिल्हाधिकारी तथा सदस्य-सचिव,**
**जिल्हा स्तरीय वनहक्क समिती,**
**कोल्हापूर**

**प्रत :- मा. मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.**
**प्रत :- मा. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे, क्वीन्स गार्डन, पुणे ४११ ००१ यांना माहितीसाठी सविनय सादर.**

अनु.जमाती व इतर पारंपारिक निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम २००८ आणि सुधारीत नियम २०१२ अंतर्गत प्रलंबित वैयक्तिक वनहक्क दावेदारांची अतिक्रमण निष्कासित न करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन परिपत्रक क्रमांक - एस-१०/२०२२/प्र.क्र.२४३/फ-३,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक- २८ नोव्हेंबर, २०२२

वाचा :

१) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८ आणि सुधारित नियम, २०१२.

२) आदिवासी विकास विभाग, शासन परिपत्रक क्र. याचिका २०१६/प्र.क्र.१२४/का-१४, दिनांक ११/११/२०१६.

अनु.जमाती व इतर पारंपारिक निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम २००८ आणि सुधारीत नियम २०१२ च्या कलम ३(१) अन्वये अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी यांना वैयक्तिक व सामूहिक वनहक्क किंवा दोहोंचे धारणाधिकार मिळण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. सदर कायद्याची सुयोग्य अंमलबजावणी होण्याकरिता तसेच वनहक्क निश्चित करण्यासाठी अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ मधील नियम ६ अन्वये राज्यात ग्रामसभा वनहक्क समित्या, उप विभागीय समित्या तसेच जिल्हास्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. सदर समित्यांव्दारे नियम १३ मध्ये विनिर्दिष्ट केलेले पुरावे व अन्य तद्नुषंगिक तरतूदी विचारात घेऊन वनहक्क निर्धारित करण्याची कार्यवाही करण्यात येते.

२. तथापि, निदर्शनास आले आहे की, कार्यबाहुल्यामुळे दाव्यांची छाननी प्रक्रिया दिर्घकाळ पर्यंत प्रलंबित रहात आहे. जिल्हास्तरीय समितीकडे वनहक्क दावे प्राप्त झाल्यापासून कमाल ६ महिन्यांच्या आत अंतिम निर्णय घ्याव्या, अशा सूचना उक्त संदर्भ क्र. २ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. वनहक्क दावे पडताळणीची प्रक्रिया सुरु असताना वनभूमीमधून निष्कासीत करण्यात येत असल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर निर्देशित करण्यात येते की, अशा जमिनींवर वनहक्क दावे दाखल असल्याची खातरजमा झाल्यास वनहक्क कायद्याच्या कलम ४ (५) मधील तरतूदींचे पालन करण्यात यावे.